पहिली खबर
FIRST INFORMATION REPORT

भारतीय नागरिक सुरक्षा संहिता - २०२३ च्या कलम १७३ अंतर्गत (Under Section 173 B.N.S.S.-2023)

1. राज्य महाराष्ट्र जिल्हा मुंबई पोलीस ठाणे क्रा.प्र.वि पहिली खबर क्र. ३६ वर्ष २०२६ दिनांक १९/११/२०२६
State District Police Station FIR No. Year Date

2. (i) अधिनियम Act .....मुंबई दारुबंदी अधिनियम..... कलमे Sections .....९३, ९२.....
(ii) अधिनियम Act .....भारतीय न्याय संहिता..... कलमे Sections .....२२८,.....
(iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections .....

3. (a) अपराधाची घटना : वार ..... तारीख पासून १९/११/२६ वेळ ..... तारीख पर्यंत १९/११/२६ वेळ २९:२६
Occurrence of offence : Day Date from Time Date to Time

वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा (Tick applicable portion).

(1) ००.०० ते ०३.०० (2) ०३.०० ते ०६.०० (3) ०६.०० ते ०९.०० (4) ०९.०० ते १२.०० (5) १२.०० ते १५.००
(6) १५.०० ते १८.०० (7) १८.०० ते २१.०० (8) २१.०० ते २४.००

(b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची तारीख १९/११/२०२६ वेळ .....
Information received at P. S. Date Time

(c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. ११ तारीख १९/११/२०२६ वेळ ०६:०५
General Diary Reference : Entry No. Date Time

4. माहितीचा प्रकार Type of Information .....लेखी फिर्यादी..... लेखी / तोंडी Written / Oral .....लेखी.....

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा ..... चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. .....
Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S. Chouki / Beat / O. P. Name and No.

(b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव वि.प. मार्ग पोलीस ठाणे, ठिकाणाचे नंबर ..... गल्ली ..... रस्त्याचे नाव वि. प. मार्ग .....
Address of Occurrence Name No. if any Ward Name of road

जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण ..... गाव डिरंगाव, मुंबई पोस्ट ..... तालुका ..... जिल्हा मुंबई राज्य महाराष्ट्र
Nearest identifiable place Village Post Taluka Dist. State

(c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे. चे नाव ..... तालुका ..... जिल्हा ..... राज्य .....
In case, outside the limit of this Police Station Taluka Dist. State

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.

(a) नाव ..... झुबादिरा मोरे ..... (b) वडिलांचे / पतीचे नाव ..... वरसंन मोरे .....
Name Father's / Husband's Name

(c) जन्म तारीख व वय ..... २६ वर्षे ..... (d) राष्ट्रीयत्व भारतीय फोन नं. ९७६५५५९७०
Date of Birth and Age Nationality Phone No.

(e) पारपत्र क्रमांक ..... दिल्याचा दिनांक ..... दिल्याचे ठिकाण ..... (f) व्यवसाय .....
Passport No. Date of issue Place of Issue Occupation

(g) धर्म Religion .....हिंदु..... जात Caste .....मराठा..... जनजात Sub-Caste .....

(h) पत्ता ..... गल्ली/सर्वे नं. ..... घर/नाव नं. ..... फोन/मो. नं. ..... पॅन नं. ..... वोटर्स नं. .....
Address Ward House Name No. Phone No. Pan No. Card No.

पद - पोलीस निरीक्षक, मालमत्ता प्रतिबंधक विभाग
रस्त्याचे नाव ..... जवळचे प्रसिद्ध ठिकाण ..... गाव ..... पोस्ट ..... पो. स्टे. .....
Road Nearest identifiable place Village Post P. Stn.

बृहन्मुंबई विभाग, मुंबई
तालुका ..... जिल्हा ..... राज्य ..... सध्याचा पत्ता .....
Taluka Dist. State Present Address

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराने प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)

Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on for 1-B of attach FIR 1-B to case diary.)

१. हरेश्वर यशवंत शेंडे वय २६ वर्षे पद - परि पो उ.नि. वि.प. मार्ग पो ठा मुंबई राहणार - वि.प. मार्ग पोलीस वसाहत, ब्लॉक क्र. ३, डिरंगाव, मुंबई-४
२. धनंजय दिलिप वायसे, पद - पोलीस शिपाई बक्कल क्र. १५११४८, नेमणुक वि.प. मार्ग पोलीस ठाणे मुंबई -

फिर्यादि

यातील फिर्यादी जगदीश वसंत पोरे, पोलीस निरीक्षक, वाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई यांचा स्वतंत्र कागदावर टंकलिखित केलेला जबाब हाच मजकूर तुम्हाची फिर्यादि म्हणून समजावा.

समक्ष

अधि

(सागर अहिरे)

पोलीस निरीक्षक

वाचलुचपत प्रतिबंधक विभाग

बृहन्मुंबई विभाग, मुंबई

फिर्यादी दिनांक १९/११/२०२६

मी, जगदीश वसंत मोरे, वय :-३६ वर्षे, व्यवसाय :- नोकरी, पद:- पोलीस निरीक्षक, नेमणुक: - लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई .मोबाईल नंबर :- ९७६७७८१०३३.

मी वरील प्रमाणे असून, दिनाक ०४/०९/२०२५ पासून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथे 'पोलीस निरीक्षक' या पदावर नेमणुकीस आहे.

मी दिनांक १६/११/२०२६ रोजी ला.प्र.वि.कार्यालयात कर्तव्यावर हजर असताना, मा.अपर पोलीस आयुक्त, ला.प्र.वि. मुंबई यांनी पडताळणी कारवाई क्रमांक:- ८१/२०२६ मध्ये माझी सापळा अधिकारी म्हणून व पर्यवेक्षक अधिकारी म्हणुन सहाय्यक पोलीस आयुक्त श्री.सुनिल हारूगडे यांची नेमणुक केल्याबाबत आदेशीत केले.

नमुद पडताळणीमधील तक्रारदार अमोल प्रमोद जाधव यांचेकडे त्यांच्या लेखी तक्रारीच्या अनुषंगाने चर्चा केली. त्यावेळी तक्रारदार अमोल जाधव, वय:- ३९ वर्षे, रा. ठी.:- रुम न २०६, नेबुला टॉवर, सिंधी गल्ली पटटेबापुराव मार्ग, गिरगाव, मुंबई असल्याचे सांगून दि. २०/१०/२०२६ रोजी वि.प.मार्ग पोलीस ठाण्यात अमोल जाधव आणि त्यांची आई प्रियंका जाधव यांच्याविरुद्ध गुन्हा नोंद क्र.:- १३८७/२०२६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असल्याचे सांगितले. सदर गुन्हयाचा तपास पीएसआय हरेश्वर शेंडे, वि.प.मार्ग पोलीस ठाणे, मुंबई हे करत आहेत. दि.१४/११/२०२६ रोजी पीएसआय शेंडे यांनी तक्रारदार व त्यांच्या आई या दोघांना पोलीस ठाण्यात बोलावून घेतले आणि नमुद गुन्हयाचा रिपोर्ट लिहीणे त्यांचे हातात असल्याचे तक्रारदार यांना सांगुन, तपासात तक्रारदार यांचे बाजुने पॉझिटीव्ह लिहीण्यासाठी व त्यांना कसलाही त्रास होणार नाही व केस उभी राहणार नाही याची काळजी घेण्यासाठी दोघांचे मिळुन ५०,०००/- रूपये लाचेची मागणी केली. त्यास तक्रारदार यांनी असहमती दर्शवली तेव्हा शेंडे यांनी तक्रारदारास सोमवारी सायंकाळी फोन करून येवुन भेट, मी काहीतरी तडजोड करतो असे सांगितले आहे. तक्रारदारास लोकसेवक यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यानुसार योग्य ती कायदेशीर कारवाई करण्याकरीता ला.प्र.वि. मुंबई कार्यालय येथे दिनांक १६/११/२०२६ रोजी लेखी तक्रार अर्ज केला आहे.

तक्रारदार यांच्या तक्रारीस अनुसरून पडताळणी कारवाईकरीता दोन शासकीय पंच १) श्री. उध्दव विठ्ठल गोरे, वय-३०, व्यवसाय - नोकरी (पद-महसूल सहाय्यक, उपजिल्हाधिकारी (अति/निष्कासन) बोरीवली मुंबई उपनगर जिल्हा यांचे कार्यालय, मुंबई व २) श्रीमती.सोनाली बाळासाहेब वर्पे, वय ३९, व्यवसाय- नोकरी (पद - शिधावाटप निरीक्षक, शिधावाटप अधिकारी,कार्यालय क्र.२७, भांडुप यांचे कार्यालय, मुंबई यांना पाचारण केले.

तक्रारदार अमोल जाधव यांचे तक्रारीस अनुसरून दिनांक १६/११/२०२६ रोजी पडताळणी कारवाईचे आयोजन केले. नमुद दिवशी पंचासमक्ष करण्यात आलेल्या पडताळणी कारवाई दरम्यान, ला.प्र.वि कार्यालयात डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालु करून तक्रारदाराने लोकसेवकास फोन लावला असता, लोकसेवकाने तक्रारदारास भेटावयास बोलावले. त्यानंतर पडताळणी पथक, पंच व तक्रारदार असे ला. प्र. वि. कार्यालयातुन रवाना होवुन लोकसेवक नेमणुकीस असलेल्या पोलीस ठाणे असलेल्या परिसरात पोहचलो. तेथे तक्रारदारास व्हॉईस रेकॉर्डर लावुन, पंच श्री गोरे यांचेसह लोकसेवक यांना भेटण्यासाठी पाठविले.

त्यानंतर वि.प.मार्ग पोलीस ठाणे येथे गेल्यावर तक्रारदार व लोकसेवक यांचे प्रत्यक्ष भेटी दरम्यान लोकसेवक पीएसआय शेंडे व तक्रारदार यांच्यात चर्चा झाली असून, तक्रारदार यांनी लोकसेवकास ५०,०००/- रुपये रक्कम कमी करण्याची व थोडीफार तडजोड करण्याची विनंती केली. त्यावर लोकसेवक शेंडे यांनी सदरचे प्रकरण महिलांशी (लेडीज मॅटर) संबंधित असल्याचे व वरच्या अधिकाऱ्यांना उत्तर द्यावे लागणार असल्याचे सांगून रक्कमेबाबत काहीही उल्लेख केला नाही. तसेच

आपण नवीन (प्रोबेशनर) असून दुसरा कोणी अधिकारी असता, तर लाख रुपये सांगितले असते, असे बोलले. यावर तक्रारदाराने रक्कम ३०,०००/- रुपये करण्यास व उद्यापर्यंत वेळ देण्याची विनंती केली,

लोकसेवकांनी प्रकरण हलक्यात न घेण्याचा सल्ला दिला व ते कर्जत येथे जाण्यासाठी ट्रेन पकडायची असल्याने निघून गेले. दरम्यान लोकसेवकांनी लाच रक्कमेबाबत काहीही सांगितले नाही, परंतु सदर कामाकरीता इतर अधिकारी यांनी लाख रुपये घेतले असते असे तक्रारदार यांना बोलले. तसेच तक्रारदार यांना उदईक रोजी फोन करण्यास सांगितले, यावरून लोकसेवक पीएसआय शेंडे हे एकाप्रकारे लाचेची रक्कम स्विकारण्यास सकारात्मक असल्याचे दिसून आले. सदरबाबत सविस्तर पडताळणी पंचनामा करण्यात आला. लोकसेवकाने सांगितल्याप्रमाणे दिनांक १७/११/२०२६ रोजी पडताळणी कारवाई दरम्यान डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालु करून तक्रारदाराने परि.पोलीस उपनिरीक्षक हरेश्वर शेंडे यांचे मोबाईल क्रमांकावर संपर्क साधला असता, ते साप्ताहिक सुटटीवर असल्याने पडताळणी मध्ये लाच रक्कमेबाबत चर्चा झाली नाही.

दिनांक १८/११/२०२६ रोजी तक्रारदार यांनी कळविले की, यातील लोकसेवक शेंडे हे त्यांचे मोबाईल क्र.९८३४८१४४०६ यावरून तक्रारदार यांच्या मोबाईल क्रमांक ८३६९३३११८५ यावर व्हॉटसॲपद्वारे वांरवार संपर्क करत होते. परंतु त्यास प्रतिसाद न दिल्याने लोकसेवक शेंडे यांनी वि.प. मार्ग पोलीस ठाणेच्या दुरध्वनी क्रमांकावरून तक्रारदार यांचे मोबाईलवर संपर्क केला असता, तक्रारदार यांनी फोन स्विकारून ते सध्या कामात व्यस्त असल्याने थोडया वेळाने लोकसेवकास भेटतील असे सांगितले. लोकसेवक शेंडे यांनी फोनवर संपर्क करून तक्रारदारास भेटावयास बोलाविल्याने आम्ही पडताळणी कारवाईचे आयोजन केले. यातील तक्रारदार अमोल जाधव हे चर्नीरोड रेल्वे स्टेशन जवळील, स.का.पाटील गार्डन, येथे भेटणार असल्याने मी व सापळा पथक पडताळणी/सापळा कारवाईकरीता आवश्यक त्या साधन सामुग्रीसह शासकिय वाहनाने १६.१० वा. लाप्रवि कार्यालयातून रवाना झालो. पथकातील इतर अंमलदार यांना ला.प्र.वि.,मुंबई कार्यालयात थांबण्याच्या सूचना दिल्या व काही वेळाने उर्वरित पथकास सदर ठिकाणी बोलावुन घेतले. आम्ही शासकीय वाहनाने स.का.पाटील गार्डन जवळ, चर्नीरोड पूर्व, मुंबई येथे पोहचलो. सदर ठिकाणी थोडया वेळात तक्रारदार अमोल जाधव हे हजर झाले. त्यांनतर वक्तव्य घेवुन डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालु करून तक्रारदार यांनी परिधान केलेल्या शर्टाच्या आतील बनियनला लावून पंच श्री गोरे यांचेसह लोकसेवक यांना भेटण्यासाठी वि.प. मार्ग पोलीस ठाणे येथे पाठविले. लोकसेवकाचे भेटीदरम्यान झालेल्या संभाषणात तक्रारदार यांच्याविरूध्द दाखल झालेल्या गुन्हयाबाबत चर्चा झाली असून, तक्रारदार यांच्याविरूध्द गुन्हा लवकरात लवकर क्लिअर व्हावा त्यासाठी तक्रारदार यांची घरच्यांशी बोलणे झाले आहे तुम्ही मला सांगा आता काय देऊ ते तुम्ही सांगा? त्यावर लोकसेवक शेंडे यांनी बघ कर तेवढ मग ते करून टाक वाटलस तर. काय प्रॉब्लेम येणार नाही तुला, करून टाक, आठ दिवसात चार्जशीट टाकतो असे सांगितले. त्यावर तक्रारदार यांनी 'किती देवू' असे विचारले असता, लोकसेवक शेंडे यांनी 'पन्नास' असे बोलून स्पष्ट लाचेची मागणी केली. त्यावर तक्रारदार यांनी डन म्हणुन प्रतिसाद दिला व किती वेळात आणू असे विचारले. तेव्हा लोकसेवकांनी दे ना. दे आता दे. आता नाही आणले का ? असे विचारले. तक्रारदाराने आता अर्ध्या पाऊन तासात लाच रक्कम आणून देतो, असे सांगितले.

त्यानंतर सापळापुर्व कार्यवाही करून सापळा कारवाई करण्याचे सर्वानुमते ठरले. मी व स.पो. आ. सुनिल हारूगडे यांनी पंच, तक्रारदार व पथकास सापळा कारवाई दरम्यान घ्यावयाच्या दक्षतेबाबत योग्य त्या सुचना दिल्या. मी तक्रारदार यांना लोकसेवक हरेश्वर शेंडे यांना लाचेची रक्कम दिल्यानंतर इशारा म्हणून सापळा पथकास दिसेल अशाप्रकारे दाढी कुरवाळने व गळयात अडकवलेली हॅन्ड बॅग हातात घेणेबाबत सुचना दिल्या. त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना लाचेच्या रक्कमे बाबत विचारणा केली असता, तक्रारदार यांनी त्यांचेकडील बचतीतील रूपये ५०,०००/- इतकी रक्कम घेवुन आल्याचे सांगितले. (त्यामध्ये रू. ५००/- दराच्या भारतीय चलनाच्या १०० नोटा) यांची प्रिंट काढण्याकरीता पीडीएफ करण्यात आली असून नोटांवरील क्रमांकांची नोंद करून घेण्यात आली.

सभक्ष,
सहा. पोलीस निरीक्षक

<u>पोलीस निरीक्षक जगदीश मोरे यांचा फिर्यादी जबाब पुढे चालु....३</u>

त्यानंतर शासकीय वाहन क्रमांक एम.एच.०१.ए.एन.१७०४ मध्ये पो.शि.चा.क्र. २३०४६३/पाटील यांनी पंच व तक्रारदार यांना ॲन्थ्रोसिन पावडरचे गुणधर्म समजावून सांगून ॲन्थ्रोसिन पावडरचा डेमो दाखविला, त्यामध्ये पावडरचा रंगाची फिक्कट निळसर चकाकी दिसून आली. पोशिचा पाटील हे पुढील कार्यवाही मध्ये सापळा पथकात नसतील असा सुचना दिल्या. पोशि. चा.क्र. २३०४६३/पाटील यांनी लाच म्हणून वापरण्यात येणाऱ्या रुपये ५०,०००/- रक्कमेतील नोटांना ॲन्थ्रोसिन पावडर लावून ती लाचेची रक्कम एका लिफाफा मध्ये ठेवुन, सदर लिफाफ्यास देखील ॲन्थ्रोसिन पावडर लावून, सदर लाच रक्कम ठेवलेला लिफाफा तक्रारदार यांच्याकडे असलेल्या हॅंडबॅग मध्ये ठेवला.

तदनंतर तक्रारदार यांनी परिधान केलेल्या शर्टाच्या आतील बनियनला व्हॉईस रेकॉर्डर लावून पंच श्री गोरे यांना लोकसेवकाच्या कार्यालयात भेट घेण्यासाठी तक्रारदार यांच्यासोबत जाण्यास सांगितले. सदर सुचनेवरुन तक्रारदार व पंच न.०१ उध्दव विठ्ठल गोरे हे लोकसेवकास भेटण्याकरीता लाचेच्या रकमेसह रवाना झाले. त्यांच्या मागोमाग मी, सपोआ सुनिल हारुगडे, पंच व इतर सापळा पथक असे जावुन लोकसेवक यांच्या वि.प.मार्ग पोलीस ठाणे,मुंबई येथे आजूबाजूस कोणास संशय येणार नाही असे सापळा रचून थांबलो होतो.

तदनंतर तक्रारदार अमोल जाधव व पंच गोरे हे लोकसेवक काम करत असलेल्या ठिकाणी वि. प. मार्ग पोलीस ठाणे येथे आत गेले. काही वेळाने तक्रारदार हे कार्यालयाच्या बाहेर आले व तक्रारदार यांनी लाचेची रक्कम लोकसेवकाने स्विकारल्याबाबतचा सापळा पथकास दिसेल अशाप्रकारे पुर्व नियोजीत इशारा केला. त्यानंतर लगेच मी, सपोआ सुनिल हारुगडे, व सापळा पथकाने पंचासमक्ष लोकसेवक हरेश्वर शेंडे यास १९:२६ वा. ताब्यात घेतले. सदर लोकसेवक हरेश्वर शेंडे यांना त्याचे पूर्ण नाव व पत्ता विचारले असता, त्यांनी त्यांचे नाव हरेश्वर यशवंत शेंडे, वय -२६ वर्षे, पद -परि. पोलीस उप निरीक्षक, नेमणुक वि.प.मार्ग पोलीस ठाणे, मुंबई रा.ठी- वि.प.मार्ग पोलीस वसाहत, रुम नं.०३, पहिला माळा, चर्नी रोड पूर्व, मुंबई ४००००४ असे सांगितले. त्यानंतर तळमजला, प्रथम चौकशी पथक, वि.प.मार्ग पेालीस ठाणे, मुंबई येथे आरोपीची अंगझडती घेतली. आलोसे यांचेकडे लाच रक्कम मिळून न आल्याने लोकसेवक शेंडे यांच्याकडे लाचेच्या रकमेबाबत पंचासमक्ष चौकशी केली असता, सदर लाच रक्कम ही लोकसेवक शेंडे यांनी पोलीस ठाणे प्रथम चौकशी पथकातील अंमलदार पोशिक्र.१५११९७/धनंजय दिलीप वायसे यांना तक्रारदार यांचेकडून स्विकारण्यास सांगितलेवरुन पोशि वायसे यांनी तक्रारदार यांच्याकडून स्विकारली. त्यामुळे तात्काळ सापळा पथकामार्फत पोशि वायसे यांचा शोध घेतला असता, लोकसेवक पोशि वायसे हे विनापरवाना पोलीस ठाण्यातून कर्तव्य सोडून पसार झाल्याचे निष्पन्न झाले. तसेच सदर बाबत तक्रारदार यांना विचारले असता त्यांनी सांगितले कि, लोकसेवक शेंडे यांनी सदर रक्कम आपला कॉन्स्टेबल आहे त्यांचेकडे दे असे म्हणुन सदर रक्कम तेथील एका कॉन्स्टेबल कडे देण्यास सांगितली असता तक्रारदाराने लाच रक्कम पाकिट सदर कॉन्स्टेबल कडे दिल्याचे सांगितले. त्यानंतर लोकसेवक श्री शेंडे यांचे परिधान केलेल्या पोलीस युनिफॉर्म शर्टावर काही ठिकाणी, उजव्या हाताचे अनामिका बोटाचे पेरावर व दोन्ही हाताचे मागील बाजुस काही ठिकाणी ॲन्थ्रासीन पावडरची फिक्कट निळसर चकाकी दिसून आली. सदरबाबतचे व्हिडिओ चित्रीकरण करण्यात आले.

तक्रारदार यांचेकडे सापळा कारवाई दरम्यान घडलेल्या घटनेबाबत विचारणा केली असता, तक्रारदार यांनी सांगितले की, लाचेची रक्कम घेवून लोकसेवक शेंडे यांचेजवळ गेलो असता, सदर लाचेची रक्कम लोकसेवक शेंडे यांनी बाजुस उभा असलेल्या एका कॉन्स्टेबलकडे देण्यास सांगितली, तेव्हा तक्रारदाराने सदर रक्कम त्या कॉन्स्टेबलकडे दिल्यानंतर लोकसेवक शेंडे यांनी तक्रारदाराचे

जवळ जावून त्यांचे हातांना स्पर्श करून त्यांना सोबत घेवून, हातात हात घालून, त्यांचेशी बोलत बोलत बाहेर घेवून आले व तक्रारदारास बाहेर सोडून आत गेले अशी हकीकत तक्रारदार यांनी आम्हास सांगितली. त्यानंतर उर्वरीत पुढील कार्यवाहीकरीता आम्ही सर्व ताब्यात घेतलेल्या अंगझडतीतील चिजवस्तू व आरोपी लोकसेवक हरेश्वर शेंडे यांचे सह ला.प्र.वि. मुंबई कार्यालयात परत आलो व सदर ठिकाणी सापळा कारवाईबाबत सविस्तर पंचनामा केला.

तक्रारदार अमोल जाधव व त्यांची आई यांच्याविरुध्द वि.प.मार्ग पोलीस ठाणे येथे दाखल असलेल्या गुन्हयाच्या तपासात तक्रारदार यांचे बाजुने पॉझिटीव्ह लिहीण्यासाठी, तक्रारदार व तक्रारदाराचे आईस कसलाही त्रास होणार नाही व केस उभी राहणार नाही याची काळजी घेण्यासाठी यातील लोकसेवक परि.पोउनि श्री हरेश्वर शेंडे,वि.प.मार्ग पोलीस ठाणे,मुंबई यांनी दिनांक १८/११/२०२६ रोजीच्या पडताळणी कारवाईमध्ये तक्रारदार अमोल जाधव यांच्याकडे ५०,०००/- रू लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाल्याने, सापळा कारवाई आयोजित केली असता, लोकसेवक हरेश्वर शेंडे यांनी त्यांचे साथीदार पोशिक्र.१५११९७/धनंजय दिलीप वायसे यांच्या मार्फतीने तक्रारदार अमोल जाधव यांचेकडुन लाच रक्कम ५०,०००/-रू स्विकारली. सदर गुन्हयातील पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने लाच रक्कमेसह पो.शि. वायसे हे फरार झाले म्हणुन माझी लोकसेवक हरेश्वर यशवंत शेंडे , परि. पोलीस उप निरीक्षक, नेमणुक- वि.प.मार्ग पोलीस ठाणे, मुंबई व लोकसेवक धनंजय दिलीप वायसे, पो.शि.१५११९७, नेमणुक- वि.प.मार्ग पोलीस ठाणे, मुंबई यांचेविरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ चे कलम ७,१२ सह भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम २३८ अन्वये कायदेशीर फिर्याद आहे.

समक्ष,

(सागर आरगडे)
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,मुंबई

तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे पडताळणी/खात्री कारवाई करुन फिर्याद

Reasons for delay in reporting by the complainant/informant

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

.....

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य .....

Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक .....

Unnatural / Accidental Death Case No., if any.

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

नमूद तारखेची व ठिकाणी यातील आरोपी क्र. १ हे तक्रारदार अल्पवयीन व त्यांची आई - यांचेविरुद्ध दाखल गुन्ह्याचे तपास अधिकारी म्हणून सदर गुन्हे तपासात तक्रारदार व त्यांच्या आईचे बाजूने पॉजिटिव्ह रिपोर्टसाठी व तक्रारदारास कसलाही त्रास न देण्यासाठी दोघांचे प्रत्येकी २५,०००/- असे एकूण ५०,०००/- रु लाचेची मागणी करुन लाच स्विकारण्यास संमती दिल्याने पडताळणी कारवाईमध्ये निष्पन्न झाले असता, सापळा कारवाईमध्ये आरोपी क्र १ यांनी लाच रक्कम आरोपी क्र. २ यांना देण्यास सांगितल्याने, लाच रक्कम आरोपी क्र. २ यांने स्विकारली व लाच रक्कमेसह फरार झाले म्हणून आरोपी क्र. १ व २ विरुद्ध ला.प्र.वि. मु.प्र.अधि कलम ७,१२ प्रमाणे

13. केलेली कार्यवाही -1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या गुन्हा नोंद

तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा : श्रीचिन्ना नामदेव जावले, सहायक पोलीस उपयुक्त, ला.प्र.वि

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण,

.....

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ..... जिल्हा ..... राज्य .....

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O) ..... Rank ..... No. .....
to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to .....

(3) Transferred to P. S. .....
District ..... on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/ informant, free of cost.
(R.O.A.C.)

14. तक्रारदाराची सही व अंगठा

Signature and Thumb impression
of the Complainant/Informant

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.

Signature of Officer in-charge, Police Station

संपूर्ण नाव Name ..... सचिन विठ्ठल भरणे

पदनाम Rank ..... पोलीस निरीक्षक

तपासिक अ. चा कोड क्र. ला.प्र.वि, मुंबई

Posting

Code No. of I. O. .....

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख .....

1. Date and time of submitted to the Court.

प्रत	2 फिर्यादी,	3. पोलीस अधीक्षक (संगणक),	4. तपासिक अंमलदार,	5. स्थळ प्रत.
Copy to	2. Complainant,	3. Supdt. of Police (Computer),	4. Inv. Officer,	5. Office Copy.

Attachment to item 7 of First Information Report